# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO 9001:2008) (ISO/IEC 27001:2005)

४ था मजला, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०० ०५१.

दू.क्र. : २६४७५०७७/२६४७७२०९ फॅक्स : ९१–०२२–२६४७३९८०

ई–मेल : secretary@msbte.com संकेत स्थळ : www.msbte.com

जा.क्र.मरातंशिमं/का-४०(परीक्षा)/लले/उ.प.२०१८/२०१८/१५६ दिनांक – 6 JUN 2018

प्रति,
प्राचार्य / संस्थाप्रमुख,
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी
संलग्न असलेल्या संस्था -

विषय –उन्हाळी परीक्षेचा ( Summer - 2018) चा निकाल जाहीर करणेबाबत

आपणांस कळविण्यांत येते की, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने घेतलेल्या उन्हाळी २०१८ च्या परीक्षांचा (Summer- 2018) निकाल दिनांक ०६.०६.२०१८ रोजी मंडळाच्या संकेतस्थळावर घोषित करण्यात आला आहे.

संस्थेतील अभ्यासक्रमनिहाय विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका दिनांक २५.०६.२०१८ पर्यंत विभागीय कार्यालयात उपलब्ध होतील. तरी गुणपत्रिका काळजीपूर्वक तपासून दिनांक २९.०६.२०१८ पूर्वी विद्यार्थ्यांना वितरीत करण्यात याव्यात.

विरजाधव

( वि. र. जाधव)
प्र.सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,मुंबई – ५१

प्रत-

१. संचालक, म.रा.तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई - यांना माहितीसाठी सादर
२. उपसचिव,म.रा.तंत्र शिक्षण मंडळ वि.का. मुंबई/पुणे/औरंगाबाद/नागपूर यांना माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी
३. प्रणाली विश्लेषक, का. क्र. ४३ परीक्षा विभाग, म.रा.तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई - यांना माहितीसाठी
४. पोर्टल मॅनेजर, म.रा.तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई - यांना सदर परिपत्रक मंडळाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात यावे.

संगिता/Sum-18 circular (Post)/(P-6)

# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO 9001:2008) (ISO/IEC 27001:2005)

४ था मजला, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०० ०५१.

दू.क्र. : २६४७५०७७/२६४७७२०९ फॅक्स : ९१-०२२-२६४७३९८०

ई-मेल : secretary@msbte.com संकेत स्थळ : www.msbte.com


जा.क्र.मरातंशिमं/का-४०(परीक्षा)/लले/उ.प.१८/२०१८/१५३ दिनांक – - 6 JUN 2018

**अत्यंत महत्त्वाचे**

प्रति,

प्राचार्य / संस्थाप्रमुख,

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी

संलग्न असलेल्या संस्था –

विषय :- निकाल जाहिर केल्यानंतर निकालपत्रक व गुणपत्रिका तपासून कार्यवाही करण्याबाबत.
परीक्षोत्तर कामांच्या सूचनांचे परिपत्रक (उन्हाळी परीक्षा – २०१८)

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या उन्हाळी २०१८ च्या परीक्षांचा निकाल मंडळाच्या संकेतस्थळावर **दि. ०६ जून २०१८** रोजी घोषित करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने खालील सूचनांचे पालन करण्यात यावे.

निकाल जाहीर झाल्यानंतर Institute Login मध्ये अभ्यासक्रमनिहाय निकालपत्रकाच्या Gazzette Soft Copy ची link देण्यांत येईल. प्रत्येक संस्थेने "Institute Copy" आपल्या स्तरावर प्रिंट करुन घ्यावी. तसेच विभागीय कार्यालयामार्फत गुणपत्रिका संस्थेला देण्यात येतील. गुणपत्रिका स्विकारताना संस्थेच्या प्रतिनिधीने गुणपत्रिका तपासून घेणे आवश्यक आहे. त्यामध्ये कुठलीही त्रुटी असल्यास विभागीय कार्यालयास तात्काळ सादर करावी. गुणपत्रिका पूर्ण प्राप्त झाल्या आहेत किंवा नाही याची शहानिशा करणे ही संस्थेची संपूर्ण जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकांबाबत काही त्रुटी असल्यास त्यासंबंधीची माहिती दि.**२९/०६/२०१८** पर्यंत विभागीय कार्यालयामार्फत मुख्य कार्यालयास कळविण्यात यावे. उन्हाळी परीक्षा २०१८ च्या निकालाच्या पार्श्वभूमीवर निघालेल्या मागील परीक्षांमधील WFLS च्या गुणपत्रिका व प्रोव्हीजनल प्रमाणपत्र उन्हाळी परीक्षेच्या गुणपत्रिकेबरोबरच वितरीत करण्यांत येणार आहेत.

**निकाल जाहिर झाल्यानंतर खालील सूचनांचे पालन करण्यात यावे.**

१. मंडळाच्या परीक्षा नियमावलीतील नियम आर जी २ सी (अे) नुसार तृतीय तथा पाचव्या सत्रांतील प्रवेशासाठी अनुक्रमे प्रथम व व्दितीय तथा तृतीय आणि चतुर्थ सत्रांतील एकत्रित अनुत्तीर्ण विषयांची संख्या विचारात घेऊन नियम आर जी २ डी नुसार विद्यार्थ्यांची पात्रता ठरवली जाते, त्या प्रमाणेच तृतीय तथा पाचव्या सत्रांच्या प्रवेशाबाबतची कार्यवाही संस्थांनी काटेकोरपणे करणे आवश्यक आहे. याबाबत निकालपत्रकावर विद्यार्थ्यांच्या मागील सत्रातील अनुत्तीर्ण विषयांची संख्या तसेच पुढील सत्रप्रवेशासाठी पात्र होण्यास एकत्रित आवश्यक कमाल अनुत्तीर्ण विषयांची संख्या नोंदविलेली आहे त्याप्रमाणेच कार्यवाही करावी.

२. गुणपत्रिका अभ्यासक्रमनिहाय स्कीमनुसार तपासून त्यानंतर गुणपत्रिका विद्यार्थ्यांना वितरीत कराव्यात.

३. अंतिम सत्राचा / वर्षाच्या विद्यार्थ्यांना गुणपत्रिका वितरित करतांना मागील सर्व सत्र उत्तीर्ण आहे यांची तपासणी करुन त्यानंतर गुणपत्रिका वितरित कराव्यात.

४. सर्व सत्राच्या विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका वितरित करतांना CPS, Condonation, Change of Scheme, Change of Course, Change of Institute, Disallowed (Dis), Eligibility Certificate इत्यादी बाबी तपासून त्या अचूक असल्याची खात्री करुनच विद्यार्थ्यांना गुणपत्रिका वितरित कराव्यात.

५. नियम RE- ८ व नियम RE-१८ प्रमाणे अनुक्रमे श्रेणीवाढ तथा फेर परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांचे गुण त्यांनी दिलेल्या विषयाप्रमाणे आहेत. याबाबत खात्री करुन तद्नंतरच विद्यार्थ्यास गुणपत्रिका दयावी.

६. विद्यार्थ्यांना सत्रनिहाय प्रथम श्रेणीमध्ये (६० टक्के) तथा प्राविण्यश्रेणीमध्ये (७५ टक्के) विद्यार्थ्यांना मिळालेल्या एकूण गुणांच्या ०.५ टक्के इतक्या गुणांचे ग्रेस मार्कींग प्रदान करण्यात येते. निकालपत्राप्रमाणे अशा विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकांवरही सदर गुणवाढ नोंदविण्यात आल्याची छाननी करुनच सदर गुणपत्रिका विद्यार्थ्यांना प्रदान करण्यात यावी.

७. ज्या विद्यार्थ्यांचे निकाल "+ **RHR** " (Forced RHR) असे जाहीर करण्यांत आले आहेत. अशी प्रकरणे निकाली काढण्याकरीता संस्थेने योग्य तो पाठपुरावा मंडळाकडे करणे आवश्यक आहे.

८. उन्हाळी परीक्षा २०१८ मध्ये परीक्षा केंद्राकडून तथा गुणमुल्यांकन केंद्राकडून प्राप्त गैरप्रकाराच्या प्रकरणांबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात आली असून दोषी व निर्दोष विद्यार्थ्यांची माहिती संस्थांच्या Login मध्ये देण्यात आलेली आहे.

९. नावात दुरुस्ती करावयाची असल्यास त्याबाबत विस्तृत माहिती ( उदा. परीक्षेचे वर्ष, आसन क्रमांक इत्यादी ) पाठवावी. नावात दुरुस्तीसाठी विहित पध्दतीनुसार मेरिट लिस्ट, दहावीच्या गुणपत्रिकेची /प्रमाणपत्राची / लिव्हींग सर्टिफिकेट इत्यादीची प्रमाणित प्रत पाठवावी. अंतिम सत्र/वर्षापूर्वीच्या सत्रांतील/वर्षातील परीक्षेच्या गुणपत्रिकांमध्ये/ प्रमाणपत्रांमध्ये नावांत बदल करावयाचा असल्यासही आवश्यक कागदपत्रे सादर करावीत. ज्या विद्यार्थ्यांच्या नावांत बदल अपेक्षित आहे त्यांना गुणपत्रिका/प्रमाणपत्र वितरीत करण्यात येवू नयेत.

१०. परिक्षकांनी **SW, PR, OR, TW, TM, ESE, PA** गुणपत्रिकेत गुण भरुन मार्कशिट Confirm करुन मंडळाकडे पाठविलेल्या गुणांमध्ये झालेल्या चुकीकरीता विहित कालावधीत गुण दुरुस्ती करण्याची संधी दिलेली असून निकाल जाहिर झाल्यानंतर गुणबदल बाबतचा कोणताही प्रस्ताव स्विकारला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

११. मंडळाकडून विद्यार्थ्यांसाठी सर्वसाधारण/शिघ्र गुणपडताळणी व सर्वसाधारण/शिघ्र फोटोकॉपी तसेच रिॲसेसमेंट ची सुविधा देण्यात आलेली आहे. याबाबतची स्वतंत्र वेळापत्रके देण्यात आलेले असून या सर्व सुविधांसाठी विद्यार्थ्यांचे अर्ज Online पध्दतीने त्या त्या सुविधेच्या विहित मुदतीतच भरुन घ्यावयाचे आहेत. सदर वेळापत्रके विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणावी.

- विद्यार्थ्यांचा रिअसेसमेंटचा online अर्ज Confirm करताना विद्यार्थ्यांस मिळालेल्या उन्हाळी परीक्षा २०१८ च्या गुणपत्रिका संस्थेकडे जमा करुन घेणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. त्याशिवाय online अर्ज Confirm होणार नाही ही नोंद घ्यावी. विद्यार्थ्यांचे रिअसेसमेंटचे निकाल change म्हणून आल्यास त्याला change गुणपत्रिका मिळण्यासाठी संस्थेत जमा असलेल्या मूळ गुणपत्रिका विभागीय कार्यालयात जमा करणे बंधनकारक राहील याची नोंद घ्यावी. No change प्रकरणात विद्यार्थ्यांची मूळ गुणपत्रिका त्यास परत देण्यात यावी.
- या सर्व कार्यक्रमांचे वेळापत्रक विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणण्याची जबाबदारी संस्थांची आहे व त्याचे पालन संस्थांनी काटेकोरपणे करावयाचे आहे.

- ज्या विद्यार्थ्यांचे निकाल आर एच आर / पी एल वाय / डब्ल्यू एफ एल वाय / एल एस पी / डब्ल्यू एफ एल एस असे नमुद करण्यात आलेले आहेत त्या विद्यार्थ्यांनीसुध्दा फोटोकॉपी तथा पुनर्गुणमुल्यांकनासाठी याच कालावधीत अर्ज करावयाचे आहेत. निकालपत्रकावरुन गुण पाहून सदर कार्यवाही विद्यार्थ्यांनी करावयाची आहे.
- ॲकेडमिक कॅलेंडरमध्ये निर्देशित केल्याप्रमाणे सैध्दान्तिक हिवाळी परीक्षा- २०१८ दिनांक १३ नोव्हेंबर २०१८ पासुन सुरु होणार असल्याने व पुनर्मुल्यांकनाचे निकाल येण्यास सोबतच्या फोटोकॉपी तथा रिॲसेसमेंटच्या वेळापत्रकाप्रमाणे आवश्यक किमान कालावधी लागणार असल्याने अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज विहित मुदतीत भरणे आवश्यक आहेच त्याचबरोबर त्या त्या अनुत्तीर्ण विषयाची परीक्षा देणे अनिवार्य आहे.

१२. सी अभ्यासक्रमांतील प्रथम / व्दितीय / तृतीय / चतुर्थ / पांचवे / सहावे सत्रांतील विषयांमध्ये अनुत्तीर्ण अशा ज्या विद्यार्थ्यांनी प्रथम / व्दितीय / तृतीय / चतुर्थ / पाचव्या / सहाव्या सत्राच्या समकक्ष अभ्यासक्रमांचे पेपर्स सोडविलेले आहेत त्यांचे गुण ८० पैकी परिवर्तीत करण्यात आलेले आहेत व ते गुणपत्रिकेत दर्शविण्यात आलेले आहेत. मात्र अशा विद्यार्थ्यांनी फोटोकॉपी मिळण्याबाबतची विनंती विहित पध्दतीने केलेली असल्यास त्यांच्या फोटोकॉपीवर नोंदविलेले गुण १०० पैकी असणार आहेत याची विद्यार्थ्यांना जाणीव करुन देण्यात यावी.

१३. अशा प्रकरणांची गुणपडताळणी करताना गुणमुल्यांकन केंद्रांनी समकक्ष विषयाच्या कमाल गुणां पैकी गुण ग्राह्य धरुनच गुणपडताळणी करावी व बदल ना-बदल प्रकरणे पाठवितांना विशेष दक्षता घेण्यात यावी.

१४. ज्या विद्यार्थ्यांचे निकाल आर एच आर/ डब्ल्यू एफ एल वाय/ पी एल वाय/ एल एस पी/ डब्ल्यू एफ एल एस अशा प्रकारच्या सदरांत आलेले आहेत अशा विद्यार्थ्यांची पूर्व माहिती (इतिहास) संस्थेतच आहे, ती पडताळून घेऊन विद्यार्थी अनुत्तीर्ण होत असल्यास त्यांचेकडून विहित मुदतीत पुढील परिक्षेकरीता अर्ज भरुन घ्यावेत. उपरोक्त बाबींत विद्यार्थ्यांचा निकाल विलंबाने लागला म्हणून परीक्षा अर्ज स्वीकारण्याची मुदत वाढवून मिळणार नाही याची कृपया नोंद घ्यावी व याबाबतची स्पष्ट सूचना विद्यार्थ्यांना देण्यात यावी.

१५. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ चे शैक्षणिक वेळापत्रक (ॲकेडमिक कॅलेंडर) मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहे. **या शैक्षणिक वेळापत्रकामध्ये हिवाळी परीक्षा २०१८ साठीच्या सर्व उपक्रमांच्या पूर्ततेचा विहित कालावधी (परीक्षा अर्ज भरण्याचा कालावधी, विलंबाने अर्ज भरण्याचा कालावधी इत्यादी) नमुद करण्यात आलेला आहे.** या सर्व विविध उपक्रमांचे कालावधीप्रमाणे तंतोतंत पालन करण्यात यावे.

१६. शिघ्र/सर्वसाधारण गुणपडताळणी आणि फोटोकॉपी तथा पुनर्गुणमुल्यांकनाच्या कार्यक्रमांची वेळापत्रकाप्रमाणे अचूक अंमलबजावणी ह्या महत्त्वाच्या बाबींसंदर्भाने सदर परिपत्रकानुसार संस्थांनी कार्यवाही करावयाची आहे.

१७. मंडळाच्या निकाल प्रक्रियाविषयक सर्व बाबी (नोंदणी अर्ज, परीक्षा अर्ज, मेन सिटींग चार्टची संगणकीय प्रणालीवरुनच केली जाणारी तपासणी) संगणकीय प्रणालीव्दारे पूर्ण करताना त्यामध्ये अपेक्षित असणारी अचूकता ही सर्व संस्थांच्या उचित पध्दतीच्या कामावर आणि वेळोवेळी निर्गमित केल्या जाणा-या परिपत्रकांतील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यावरच अवलंबून आहे. त्यामुळे परिपत्रकांचे अचूक काटेकोरपणे पालन करण्यावर व त्याप्रमाणे अंमलबजावणी करण्यावर संस्थांनी अधिक भर देण्याची आवश्यकता आहे व यामध्ये संस्थाप्रमुखांनी विशेष दक्षतापूर्वक आपली जबाबदारी पार पाडावयाची आहे.

१८. कोणत्याही कारणामुळे जर विद्यार्थ्यांचा निकाल सुधारणा करणे आवश्यक असल्यास ही सर्व प्रकरणे १५ जून २०१८ पर्यंत मंडळाच्या मुख्य कार्यालयात थेट सादर करणे आवश्यक आहे.

(वि. र. जाधव)
प्र.सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,मुंबई — ५१

प्रत —

१) मा. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई - ४०० ०५१ यांना सादर.

२) उपसचिव, सी डी सी विभाग, म.रा. तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई - यांना माहितीसाठी

३) उपसचिव, परीक्षा विभाग, म.रा. तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई - यांना माहितीसाठी

४) उपसचिव, म.रा.तं.शि.मं.वि.का.मुंबई/पुणे/औरंगाबाद/नागपूर यांना माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी.

५) कार्यासन अधिक्षक, का. क्र. ४३ - आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

६) पोर्टल व्यवस्थापक - संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.

संगिता/Sum-18 circular (Post)/(P-1-4)